अंक ८ : जुन २०१३

# समजदार जोडीदार

सेंटर फॉर हेल्थ अँड सोशल जस्टिस - पुणे, गावपातळीवरील जनजागृती व खाजगी वितरणासाठी प्रकाशित

## " आणि कमलला न्याय मिळाला "

ही कथा अस्तित्व संस्था, सांगोला या संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील वीस गावापैंकी टिप्पेहाळी गावातील विवाहीत स्त्री ची आहे.

कमल (काल्पनिक नाव) या विवाहीत महिलेला तीचा पती तीला रोज मारहाण व छळ करायचा आणि तुझे दुसऱ्या मुलासोबत संबंध आहेत असा संशय घेत होता. रोजच्या छळाला कंटाळून तिने सासर सोडले व मागील चार महिन्यांपासून माहेरी राहात होती.

त्याच काळात कमलच्या पतीने व चुलत सासऱ्याने वकिलांकडे जावून घटस्फोट घेण्याची चर्चा केली व पोलिसात तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला.

कमलचे वडील यांनी अस्तित्व संस्थेचे ॲनिमेटर व फॅसिलीटेटर यांची याबाबतीत मदत घेतली. प्रथम ते त्यांच्या जावयाला २-३ वेळेस भेटले आणि कमलला घरी (सासरी) घेवून जाण्यासाठी विनंती केली, परंतू तीच्या पतीने तीचे इतर मुलासोबत संबंध आहेत म्हणून घरी आणण्यास नकार दिला. परंतू कमलच्या वडीलांना कमलच्या वागण्याबद्दल खात्री होती.

त्याचवेळी गावात अस्तित्व संस्थेकडून आम्ही पुरुष समानतेसाठी हे अभियान चालु होते. कमलचे वडील तेथे हजर होते. त्यांनी अस्तित्व संस्थेचे प्रेरक महादेव भजबळकर, उपसरपंच, तंटामुक्ती समितीचे सदस्य व अस्तित्व संस्थेच्या सुनिता धनवडे यांना कमलची सगळी हकीगत सांगितली व कमलला न्याय मिळवून देण्याची विनंती केली.

कमलचे वडील पोलीस स्टेशनला तक्रार करायला घाबरत होते. परंतु सुनिता धनवडे व इतर कार्यकर्ते त्यांना घेवून पोलिस ठाण्यात गेले. त्यांनी तक्रार दिली. पोलीसांनी कमलच्या पतीला बोलावून घेतले व पत्नी तसे वागते असा पुरावा देण्यास सांगितले. परंतू तो पुरावा देवू शकला नाही.

पोलीसांनी कमलच्या पतीला समज दिली व कमलला घरी घेऊन जाण्यास सांगितले. त्याचा परिणाम म्हणून कमलच्या पतीने कमलला त्याच्या घरी (सासरी) घेवून गेला.

## " कायद्याची माहिती मिळाल्यामुळे हिंसेविरोधात न्याय मागण्याचे बळ मिळाले "

ही कथा नारी समता मंचच्या कार्यक्षेत्रातील हरिश्चंद्री गावातील लक्ष्मी जाधव (नाव बदलले आहे) या महिलेची आहे जिने हिंसा विरोधी कायद्याच्या जनजागृती / माहितीमुळे स्वतः वरील हिंसा थांबवली.

लक्ष्मीला तिचे दीर व भावजय वेळोवेळी विनाकारण शिव्या देत असतं. गावातील प्रतिष्ठित

**स्त्री - पुरूष समानता, हीच देशाची महानता**

नागरिकांनी दोन्ही कुटुंबांना एकत्रित बसवून भांडण सोडविण्याचे अनेकदा प्रयत्न केले होते. परंतू लक्ष्मीला त्यांचे त्रास देणे चालुच होते. रोजच्या भांडणामुळे दोन्ही कुटुंबाचे संबंध बिघडत चालले होते. यावर काहीच उपाय दिसंत नव्हता.

लक्ष्मीला एके दिवशी तीच्या घरात घरगुती हिंसाचार विरोधी कायदा - २००५ हे कायदे विषयक पुस्तक मिळाले. सदर पुस्तक हे फॅसिलीटेटर जगदीश यांनी वितरीत केले होते. लक्ष्मीने हे पुस्तक वाचले व या पुस्तकातुन तीला महिला हिंसा विरोधी कायद्याविषयी माहिती मिळाली, ती पोलिस स्टेशनला गेली व वरील कायद्याखाली संबंधित कुटुंबाविरोधात तक्रार दाखल केली. तक्रार दाखल केल्यानंतर लक्ष्मीने (एन.सी) नंबर देखील घेतला. त्या कुटुंबाला पोलीस स्टेशनला बोलविण्यात आले व भविष्यात लक्ष्मीला कोणत्याही प्रकारचा त्रास दिला तर महिला हिंसा विरोधी कायद्या अंतर्गत कायदेशिर कारवाई करण्याचा इशारा दिला व समज देवून त्यांना सोडून देण्यात आले.

संस्थेकडून मिळालेल्या पुस्तकामुळे लक्ष्मीला घरगुती हिंसा विरोधी कायद्याची माहिती मिळाली व त्या माहितीचा उपयोग करून तिने स्वत:वरील हिंसा थांबविण्यात यश मिळवलं.

## “आणि गटसदस्याने हुंडा घेण्यास केला विरोध ”

ही कथा सावित्रीबाई फुले महिला मंडळ, बीड या संस्थेच्या कार्यक्षेत्रातील वांगी या गावातील अविवाहित गट सदस्याने हुंडयाला विरोध करून हुंडा न घेता केलेल्या लग्नाची आहे.

दिपक (नाव बदललेले आहे) हे गटसदस्य म्हणून प्रेरक नाना डोळस यांच्यासोबत गटातील सक्रीय कार्यकर्ते आहेत.

दिपकला त्याचे वडील त्याच्या लग्नासाठी मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमाला बाजुच्या गावात घेवून गेले. दिपकला मुलगी पसंत पडली व मुलीसही मुलगा पसंत पडला. त्यावेळी दिपकच्या वडीलांनी देण्या - घेण्याच्या रिवाजात हुंडयाची मागणी केली त्यावेळी मुलीच्या घरच्यांनी हुंडा देण्यास नकार दिला. मुलीची परिस्थीती गरिबीची होती. जमलेले लग्न हुंडयामुळे मोडण्याची वेळ आली होती. दिपकला हे लग्न मोडू नये असे वाटत होते म्हणून त्याने गावचे प्रेरक नाना डोळस यांना भेटून सर्व हकीगत सांगितली. नाना डोळस म्हणाले, जर तुला मुलगी आवडली असेल व मुलीस पण तु आवडला असशील तर विना हुंडा लग्न करायला हवे. शेवटी आयुष्य दोघांना एकत्रित जगायचे आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे आयुष्यात “समजदार जोडीदार” मिळणे खुप महत्वाचे आहे.

दिपकने वरील गोष्ट वडीलांना समजावून सांगितली व वडीलांनी ही जास्त विरोध न करता सहमती दर्शविली. हुंडा न घेता लग्न केले. तसेच दिपकच्या वडीलांनी मुलीकडील मंडळींना पंचवीस हजार रूपये लग्नखर्च म्हणून दिले.

अशाप्रकारे कोणताही हुंडा न घेता लग्न पार पडले.

## “गट सदस्यांच्या पुढाकाराने हिंसाचारास प्रतिबंध केला !”

ही कथा हॅलो मेडिकल फाऊंडेशन या संस्थेच्या अक्कलकोट तालुका कार्यक्षेत्रातील दर्शनाळ या गावातील भविष्यात होणाऱ्या गावातील गणेश मंडळांमधील संघर्ष व हिंसा थांबविण्यासाठी प्रेरक व गटसदस्य यांनी केलेल्या प्रयत्नांची आहे.

दर्शनाळ येथे पुर्वी एकच गणेश मंडळ होते. परंतु येवु घातलेल्या ग्रामपंचायत निवडणूकीच्या धर्तीवर गावातील

**आमच्या गावाची महानता, स्त्री पुरूष समानता**

काही राजकारण्यांनी स्वतःची ताकद वाढविण्यासाठी व दाखविण्यासाठी नवीन दोन गणेश मंडळे स्थापन केलीत.

प्रेरक शशिकांत दबडे व त्यासोबत गटसदस्य सुनिल, बसवराज, विजय आणि सुभाष यांनी वेळीच धोका ओळखून त्यांनी त्या तीन गणेश मंडळांच्या अध्यक्षांना प्रत्यक्ष जावून भेटले व त्यांना गणेशोत्सव हा शांतता, अहिंसात्मक व खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्याची विनंती केली.

या सर्वांचा परिणाम म्हणजे गावात गणेशोत्सव अतिशय आनंदात, शांततेत व जल्लोषात पार पाडला. तसेच तीनही गणेश मंडळांनी शेवटच्या दिवशी गणेश विसर्जन मिरवणूक एकत्र येवून पार पाडली.

## " आणि विभक्त जोडपे पुन्हा एकत्र आले !! "

ही कथा युवा ग्राम, केज (बीड) या संस्थेच्या हनुमंत पिंपरी या गावातील रमेश व निलम (नावे बदलली आहेत) या विवाहित जोडप्यास पुन्हा एकत्र आणण्यासाठी प्रेरक व गट सदस्यांनी केलेल्या कृती संदर्भात आहे.

निलमला तीचा पती रमेश रोज दारू पिऊन मारहाण करित असे. ती सततच्या मारहाणीमुळे कंटाळुन माहेरी आली. नीलमचे वय ५० वर्षे इतके आहे, तीला दोन मुलगे अनुक्रमे २६ व २३ वय वर्षे असलेली आहेत.

नीलमचा पती रमेश याने संस्थेचे प्रेरक मनोज गायकवाड यांनी नीलमला मुलांसह परत आणण्यासाठी विनंती केली. प्रेरक मनोज याने रमेशला सांगितले की, तु दारू सोड तरच मी तुझ्या पत्नी व मुलांना घेऊन येईल. त्यानंतर रमेशने ५ वेळा दारू सोडण्याचा प्रयत्न केला व शेवटी त्याने पुर्णपणे दारू सोडली. खरचं त्याने दारू सोडली का याची मनोजने पुर्ण खात्री केली. प्रेरक मनोज याने २ ते ३ वेळेस निलमच्या वडीलांकडे जावून सांगितले की, रमेशने दारू पूर्णतः सोडली आहे व त्यामुळे तो कोणत्याही प्रकारे त्रास देणार नाही असे सांगितले. शेवटी निलमच्या वडीलांनी खात्री करून विचारले की, जर रमेश दारू पिणार नसेल व मारहाण करून कोणत्याही प्रकारे त्रास देणार नसेल तर मी नीलमला तीच्या मुलांसह रमेशकडे सासरी पाठवितो. प्रेरक मनोजने रमेशच्या वर्तनाविषयी जबाबदारी घेतली तसेच निलमच्या सहमतीनिशी तीच्या वडीलांनी तीला रमेशकडे पाठविले.

रमेशला स्वतःची चुक कळाली, त्याने दारू पिणे सोडले. त्याच बरोबर मारहाण वाईट असते म्हणून त्याने ते न करण्याचा निर्णय घेतला.

अशा प्रकारे तुटणारे कुटुंब जोडले गेले.

## " बालविवाहास केला प्रतिबंध ! "

हॅलो मेडिकल फाऊंडेशन, अणदुर या संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील ही कथा सोलापुर जिल्हयातील अक्कलकोट तालुक्यातील बणजोगळ या गावातील आहे. या गावात अनिल (नाव बदललेले आहे ) कुटुंबासह राहात आहेत. त्यांना सोनाली नावाची मुलगी आहे. सोनाली १० वीत शिकत आहे. त्यांनी मुलीचे लग्न करायचे ठरविले, ठरल्याप्रमाणे ते बाजुच्या गावात गेले व मुलगा पसंत केला. मुलाला व त्याच्या नातेवाईकांना मुलगी पाहण्याच्या कार्यक्रमाला बोलाविले. मुलगा व नातेवाईक एके दिवशी मुलगी बघायला गेले. तिथे त्यांना मुलगी पसंत पडली. म्हणून मुलाच्या वडीलांनी मुलीचे वडील अनिल यांना पानसुपारी फोडून लग्नाची तारीख काढण्यासाठी तुमच्या नातेवाईकांना बोलवा म्हणून सांगितले. अनिलने गावातील नातेवाईकांना कार्यक्रमास बोलाविले. त्यातच दयानंद नावाच्या जवळच्या नातेवाईकाला बोलाविले.

**हिंसेने कुठलेच प्रश्न सुटत नाहीत, यावर माझा विश्वास आहे.**

दयानंद हा समजदार जोडीदार प्रकल्पातील विवाहित गटाचा सदस्य आहे. त्याने गावाचे प्रेरक अमृत मुळे यांना सोबत येण्याची विनंती केली.

गावाचे प्रेरक व गटसदस्य यांनी अनिल यांना विचारपुस केली. त्यांनी मुलीचे वय विचारले असता अनिल यांनी १६ -१७ असे सांगितले. त्याचवेळी प्रेरक अमृत मुळे व गटसदस्य दयानंद यांनी त्यांना बालविवाहाचे दुष्परिणाम सांगितले. मुलीचे लहान वयातच लग्न केल्यास तिचे शरीर परिपक्व नसल्याने तसेच बाळंतपणाच्या वेळी आई व बाळ दोघांनाही जीवास धोका होऊ शकतो. एवढेच नाही तर बालविवाह हा कायद्याने गुन्हा सुध्दा आहे.

अनिलने वरील माहिती ऐकताच मुलगी पुढील वर्षी १८ वर्षाची होईल म्हणून १ वर्षे उशिरा लग्नाची तारीख काढली अशाप्रकारे होणारा बालविवाह वेळीच रोखला गेला.

## आणि भटक्या समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी व त्यांच्या घरकुलासाठी प्रेरकाचे प्रयत्न अपुरे पडले !!

ही कथा नारी समता मंच, पुणे या संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील करंदी या गावातील प्रेरक विजय कव्हे यांनी कातकरी समाजातील मुलांचे शिक्षण व घरकुल यासाठी केलेल्या प्रयत्नांची आहे.

मी विजय कव्हे करंदी गावात नारी समता मंच या संस्थेच्या समजदार जोडीदार प्रकल्पामध्ये प्रेरक म्हणून काम करतो. मी असे बघितले की, गावातील कातकरी समाजातील मुले मागील वर्षी शिक्षणापासून वंचीत होती. त्यांना या वर्षी शैक्षणिक वर्षापासून शिक्षण मिळावे म्हणून मी कातकरी पालकांशी संवाद साधून त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले व मुलांना शाळेत पाठवा असे आवाहन केले. त्याचबरोबर त्यांना सांगितले की तुम्हाला काही अडचणी आल्यास माझ्याशी संपर्क साधावा. परंतू मुलांना शाळेत पाठवाच. कातकरी पालकांनी मला होकारात्मक प्रतिसाद दिला. मी स्वतः त्यासाठी शिक्षण समितीचे अध्यक्ष यांना भेटलो.

शाळा सुरू झाल्यानंतर मला ती मुले शाळेत मात्र दिसली नाहीत. मी पुन्हा कातकरी वस्तीत गेलो व पालकांना मुले शाळेत न येण्याचे कारण विचारले. त्याचबरोबर मी असे सांगितले की, शाळेत गणवेश, पुस्तके इ. मोफत मिळतात, मग मुले न पाठविण्याचे कारण काय? पालकांनी उत्तर दिले की, मुले वर्गात फार काळ बसत नाहीत लगेच घरी येतात.

मला मात्र वरील गोष्टीचे आश्चर्य वाटले. मी मुळ कारण शोधले असता असे लक्षात आले की, शाळेत इतर जातीतील मुले कातकरी मुलांना आपल्यात मिळू - मिसळू देत नाहीत. त्यामुळे ही मुले फार काळ वर्गात बसत नाहीत. तसेच शाळा ते कातकरी वस्ती अंतर खुपच आहे.

कातकरी लोकांना रहायला पक्की घरे नाहीत म्हणून मी गावातील सरपंच यांना सांगितले. मागील तीन वर्षापासून त्यांना सरकारी योजनेतून घरकुल मिळावे किंवा गावालगतच त्यांना सहा गुंठे जागा मिळावी म्हणून प्रयत्न करीत आहे. प्रत्येक वेळेस होकारात्मक प्रतिसाद येतो परंतू कृती मात्र होतच नाही. तरी देखील मी माझे प्रयत्न सोडलेले नाहीत.

अद्यापही कातकरी मुलांच्या शिक्षणासाठी व कातकरी लोकांच्या घरकुलासाठी माझे प्रयत्न चालु आहेत.

**भाई भी घर मे हाथ बटाये - तभी तो बहना पढने जाए ।**



प्रेरक प्रशिक्षण, बीड



प्रेरक प्रशिक्षण, अणदूर



प्रेरक प्रशिक्षण, नारी समता मंच, पुणे



प्रेरकांसोबत मासिक बैठक, एसपीएमएम, बीड

## संपादकीय

समजदार जोडीदार प्रकल्पाच्या मागील तीन महिन्यांमध्ये कामाचा भर हा प्रामुख्याने सरकारी ठराव व निर्णयांची गावपातळीवर ग्रामपंचायतींच्या माध्यमातून अंमलबजावणी करणे उदा. बंधनकारक विवाह नोंदणी, घर दोघांचे नावाने करणे व महिला ग्रामसभा इ. हा होता.

त्याचबरोबर शाळेत जाणाऱ्या व शाळाबाहय किशोरवयीन मुला - मुलींची यादी तयार करणे, गावाचे जेंडर मॅपिंग करणे, मागील तीन वर्षामधील जन्माच्या वेळचे लिंग गुणोत्तर काढणे, हिंसामुक्त गावासाठी शपथ ग्रहणसमारंभ, नवविवाहीत जोडप्यांचे मार्गदर्शन हा देखील कामाचा मुख्य भाग होता. युवक व विवाहीत गट सदस्यांसोबत गट बैठकीद्वारे शंभर गावांमध्ये लैंगिकता, लैंगिकतेबद्दल समज - गैरसमज, मर्दानगी, समता व समानता या विषयांवर सत्रे घेऊन वरील विषयांवर यशस्वी चर्चा घडवून आणली गेली. मागील तीन महिन्यांमध्ये गाव पातळीवर प्रेरक व गट सदस्यांनी वेगवेगळया विषयांवर केलेल्या कृती संदर्भात ३५ कथा मिळाल्या असून त्यापैकी ७ कथांचा या आवृत्तीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**महिलांवरील हिंसा रोखणार कोण - आपण सगळे दुसरे कोण ?**